| | |
|---|---|
| | दाखल दिनांक – २५.०८.२०२५<br>नोंदणी दिनांक – २५.०८.२०२५<br>निकाल दिनांक – २०.०७.२०२६<br>कालावधी – ०० १० २५<br>वर्षे महिने दिवस |

**खटला क्र. ४१८०/स.ख./२०२५** **निशाणी क्र.**

CNR : *MHMM250042952025*

**प्रपत्र क्र. ३२**

**भाग–अ**

**(न्यायनिर्णयाचे शिर्षकपृष्ठ)**

**(फौजदारी नियमावलीतील पाठय ६ मधील परिच्छेद ४४(१) नुसार)**

**(पहा– अपराधिक प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३५३ अथवा, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३९२)**

**मुंबई येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.३९), विलेपार्ले, मुंबई यांचे न्यायालयात...**

(पिठासीन अधिकारी **श्री. अमृत चं. बिराजदार**)

**न्या य नि र्ण य**

(दि. २०/०७/२०२६ रोजी उद्घोषित)

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**पी–दक्षिण प्रभाग,** गोरेगाव (प), मुंबई
तर्फे राकेश डब्लु सोनावणे,
सहा. विधी अधिकारी
} ..... **फिर्यादी**

**.. विरुध्द ..**

**श्री. किशोर रामलिंग गायकवाड,**
**वय–** ४५ वर्षे,
**रा.** मे.एग स्टेशन, शॉप नं १, सबकुच फुड प्लाझा जवळ, न्यु लिंक रोड, चिंचोळी बंदर रोड, मालाड प. मुंबई.
} ..... **आरोपी**

दोषारोप – **मुंबई महानगर पालिका अधिनियम, १८८८ चे कलम ३९४(१)(इ)(एक) च्या उल्लंघनार्थ कलम ४७१ अन्वयेच्या शिक्षापात्र गुन्हयासाठी ...**

**प्रतिनिधित्व:**

श्री. राकेश डब्लु सोनावणे सहा. विधी अधिकारी– **फिर्यादीतर्फे**

श्रीमती जे. एस. प्रभु – अधिवक्ता – **आरोपीतर्फे**

आरोपीविरुध्द **मुंबई महानगर पालिका अधिनियम, १८८८** (*यापुढे ज्याचा उल्लेख*

***'महापालिका अधिनियम' असा करण्यात आला आहे.***) चे **कलम ३९४(१)(इ)(एक) च्या उल्लंघनार्थ कलम ४७१** अन्वयेच्या शिक्षापात्र गुन्हयासाठी **भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३** (***यापुढे ज्याचा उल्लेख 'संहिता' असा करण्यात आला आहे.***) मधील **पाठय २१** मध्ये विहित प्रक्रिया पध्दतीनुसार संपरिक्षा सुरु आहे.

**<u>फिर्यादीचे कथन थोडक्यात असे की,</u>**

२. फिर्यादीचे कथन असे की, फिर्यादी ही विशेष अधिनियमाद्वारे अस्तित्वात आलेली संस्था आहे. फिर्यादी यांनी **महापालिका अधिनियमातील कलम ६८** नुसार प्रत्यायोजित अधिकारानुसार व **संहितेचे कलम २१०(१)(अ), सहकलम २(ह)** नुसार प्रस्तुतची फिर्याद दाखल केली आहे. ज्या महानगरपालिकेच्या उपायुक्तांनी फिर्यादी यांना अधिकार प्रत्यायोजित केले आहेत त्या उपायुक्तांना महापालिकेच्या आयुक्तांनी असे अधिकार प्रत्यायोजित केले आहेत. महापालिकेच्या पी/दक्षिण प्रभागातील डॉ. श्री. अजित ज्ञानोबा पंपटवार व महेंद्र डी. चव्हाण – स्वच्छता निरीक्षक यांना महापालिकेच्या उपायुक्तांनी प्रत्यायोजित केलेल्या अधिकाराच्या अनुषंगाने महापालिका अधिनियमातील तरतुदींच्या उल्लंघनाबाबत संबंधितांवर कारवाई व कार्यवाही करण्याचे अधिकार आहेत.

३. दिनांक ११/०६/२०२५ रोजी डॉ. अजित ज्ञानोबा पंपटवार व स्वच्छता निरीक्षक श्री.महेंद्र डी. चव्हाण हे त्यांच्या कार्यक्षेत्रात तपासणीसाठी गेले असता, त्यांना यातील आरोपी हे मे.एग स्टेशन, शॉप नं १, सबकुच फुड प्लाझा जवळ, न्यु लिंक रोड, चिंचोळी बंदर रोड, मालाड प. मुंबई या ठिकाणी खानावळीचा व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास आल्यावरून त्यांनी आरोपीस त्याच्याकडे असा व्यवसाय करण्यासाठी महापालिका अधिनियमातील तरतुदींनुसार आवश्यक असणाऱ्या अनुज्ञप्तीची मागणी केली असता, आरोपीकडे अशी अनुज्ञप्ती नसल्याचे आढळून आले. अशाप्रकारे, आरोपीने **महापालिका अधिनियमातील कलम ३९४(१)(इ)(एक) च्या तरतुदीचे उल्लंघन करून याच अधिनियमातील कलम ४७१** नुसार अपराध केल्याचे श्री. महेद्र डी. चव्हाण यांचे मत झाले. त्याचवेळी श्री. चव्हाण यांनी तपासणी अहवाल तयार करून त्या अहवालाची मूळ प्रत आरोपीस देऊन त्याच्या कार्बन प्रतीवर पोहोचदाखल आरोपीची स्वाक्षरी घेतली. त्यानंतर सदर तपासणी अहवाल, गुन्हापत्रकासह आरोग्य विभागाचे आरोग्य अधिकारी यांच्यासमोर सादर केला

असता, आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी श्री.चव्हाण यांना आवश्यक त्या तरतुदींनुसार आरोपीविरूध्द अपराधिक खटला दाखल करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यास आदेशित केल्यावरून श्री. चव्हाण यांनी त्यासाठी प्रस्तुतचे प्रकरण फिर्यादी यांच्याकडे संदर्भित केले. फिर्यादी असे नमूद करतात की, श्री. चव्हाण यांनी आरोपीस वैध अनुज्ञप्ती सादर करण्यासाठी वाजवी संधी दिली होती, मात्र, आरोपी अशी अनुज्ञप्ती सादर करू शकला नाही. सबब, प्रस्तुतची फिर्याद असे.

४. प्रस्तुतचे प्रकरण दाखल झाल्यानंतर **संहितेचे कलम २१०** मध्ये नमूद तरतुदीची पुर्तता करून, तसेच, **संहितेचे कलम २२३ व २२५** मधील तरतुदीचे अनुपालन करून **संहितेचे कलम २२७** नुसार न्यायालयाने आरोपीविरूध्द **महापालिका अधिनियमाचे कलम ३९४(१)(इ)(एक)** च्या उल्लंघनार्थ **कलम ४७१** अन्वयेच्या शिक्षापात्र गुन्हयासाठी आदेशिका जारी केली. तदनंतर, आरोपी हे न्यायालयासमोर हजर झाल्यानंतर व जामीनपत्राची विहित पुर्तता केल्यानंतर न्यायालयाने **निशाणी क्र.८** नुसार आरोपीस दोषारोपीत गुन्हयाचा तपशील वाचून व समजावून सांगितला असता, आरोपीने दोषारोपीत गुन्हा अमान्य करून गुन्हयाच्या संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविल्यावरून **संहितेचे पाठ्य २१ मध्ये नमुद प्रक्रिया पध्दतीनुसार** प्रकरणाची संपरिक्षा घेण्यात आली. आरोपीचे गुन्हयाबाबतचे निवेदन **निशाणी क्र.९** वर नोंदविण्यात आले.

५. **संहितेचे कलम २७७(१)** नुसार फिर्यादी पक्षाकडून केवळ एक साक्षीदार तपासण्यात आला. फिर्यादी पक्षाने **निशाणी क्र.१५** वरील पुरसिसीद्वारे आपला पुरावा बंद केला. आरोपीने **निशाणी क्र.१७** वर **संहितेचे कलम ३५१(५) नुसार** आपले लेखी निवेदन सादर केले. **संहितेचे कलम ३५१(१)** ची पुर्तता म्हणून सदर लेखी निवेदन स्विकारण्याबाबत आरोपीने विनंती केल्यावरून ते स्विकारण्यात आले. आरोपीने त्याच्या बचावार्थ कोणताही पुरावा सादर केला नाही किंवा स्वत:ला अथवा इतर कोणालाही साक्षीदार म्हणून तपासले नाही. फिर्यादीने दाखल केलेला खटला व त्यातील आरोप खोटे आहेत असा आरोपीचा बचाव असल्याचे आरोपीच्या लेखी निवेदनावरून न्यायालयाच्या निदर्शनास येत आहे.

६. फिर्यादी पक्षाकडून सहा. विधी अधिकारी श्री. राकेश डब्लु सोनावणे व आरोपीच्या वतीने अधिवक्ता श्रीमती जे.एस. प्रभु यांचा तपशीलवार युक्तीवाद ऐकला.

**७.** फिर्यादमधील अभिकथनावरून व अभिलेखावर आलेल्या मौखिक व कागदोपत्री पुराव्यावरून एकंदरीत पुढील बाबी न्यायालयाच्या विचारार्थ निर्माण होतात. त्यावरील निष्कर्ष त्यापुढे येणाऱ्या कारणमिमांसेस अनुसरून हे न्यायालय पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | **विचारार्थ बाबी** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि. ११/०६/२०२५ रोजी यातील आरोपी हे मे.एग स्टेशन, शॉप नं १, सबकुच फुड प्लाझा जवळ, न्यु लिंक रोड, चिंचोळी बंदर रोड, मालाड प. मुंबई वैध अनुज्ञप्ती नसताना व्यावसायिक खानावळीचा व्यवसाय करीत असल्याचे तो उद्योग त्या ठिकाणी केल्याचे फिर्यादी पक्ष सिध्द करतो काय ? | **होकारार्थी ..** |
| २. | आदेश काय ? | **आरोपीस सिध्दापराधी घोषित करून त्यास अंतिम आदेशाप्रमाणे शिक्षा ठोठाविण्यात येते.** |

**<u>का र ण मि मां सा</u>**

**८.** आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादी पक्षाने **संहितेचे कलम २७७(१)** नुसार केवळ एक साक्षीदार तपासला. श्री. अजित ज्ञानोबा पंपटवार यांना फिर्यादी साक्षीदार क्र. १ म्हणून नि.क्र.११ वर तपासण्यात आले. याशिवाय, फिर्यादीपक्षाने खालील कागदोपत्री पुराव्यांवर आपली भिस्त नोंदविली.

| **अ.क्र.** | **कागदपत्राचे तपशील** | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|
| १. | प्राधिकारपत्र | १२ |
| २. | तपासणी अहवाल | १३ |
| ३. | गुन्हापत्रक | १४ |

**<u>विचारार्थ बाब क्र. १ करिताः–</u>**

**९.** प्रस्तुत खटल्यात आरोपीविरुध्द त्याने **महापालिका अधिनियम चे कलम ३९४(१)(ई)(एक)** च्या तरतुदीचे उल्लंघन केल्याचा दोषारोप आहे. परिणामी, सदरची तरतुद पाहणे प्रासंगिक व आवश्यक बनते. **महापालिका अधिनियम चे कलम ३९४(१)(ई)(एक)** ही तरतुद पुढीलप्रमाणे

उध्दृत करते.

> ***"३९४. अनुज्ञप्तीशिवाय विवक्षित माल किंवा जनावरे न ठेवणे आणि विवक्षित उदीम, प्रक्रिया व काम चालू न ठेवणे आणि धोका किंवा उपद्रव होऊ नये म्हणून अभिग्रहण व नष्ट वगैरे केल्या जाण्यास पात्र असलेल्या विवक्षित वस्तू:***
> *(१) आयुक्ताने दिलेल्या अनुज्ञप्तीच्या अटी व शर्ती याअन्वये आणि त्यांस अनुसरून असेल ते खेरीजकरून एरव्ही, कोणतीही व्यक्ती–*
>
> *(अ) .......................................*
>
> *(ब) .......................................*
>
> *(क) .......................................*
>
> *(ड) .......................................*
>
> *(इ) कोणत्याही परिवास्तूत किंवा परिवास्तूवर, –*
>
> *(एक) अनुसूची 'म', भाग चार यात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या उदीमांपैकी कोणत्याही उदीम किंवा अशा कोणत्याही उदीमाशी संबंधित असलेली कोणतीही प्रक्रिया किंवा काम चालवणार नाही किंवा चालवण्यास मुभा देणार नाही किंवा चालवलेली खपवून घेणार नाही,*
>
> *(दोन) ....................................... "*
>
> *(तरतुदीचा आवश्यक व संबंधित भाग नमुद केला आहे.)*

**१०.** उक्त तरतुदीचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, कोणत्याही व्यक्तीस, महापालिका अधिनियमाचा अंमल व प्रभाव असणाऱ्या क्षेत्रात महापालिका आयुक्ताने दिलेल्या अनुज्ञप्तीशिवाय, व अशी अनुज्ञप्ती दिली असल्यास, त्या अनुज्ञप्तीमधील अटी व शर्तींच्या विपरीत, कोणत्याही वास्तूमध्ये अथवा वास्तूवर अधिनियमातील अनुसूची 'म', भाग चार मध्ये नमुद केलेल्या उदयोगांपैकी कोणताही उदयोग अथवा कोणत्याही उदयोगाशी संबंधित असलेली कोणतीही प्रक्रिया अथवा काम चालविता येणार नाही, किंवा, ते चालविण्यास मुभा देता येणार नाही किंवा, ते चालविणे मान्य असणार नाही. आणि, असे कृत्य कोणी व्यक्ती करीत असेल तर असे कृत्य हे या तरतुदीचे उल्लंघन ठरेल व परिणामी, ते **महापालिका अधिनियमातील कलम ४७१** मधील तक्त्यातील **नोंद क्र.१२०** नुसार दंडनीय व शास्तीजन्य अपराध ठरेल.

**११.** श्री. डॉ. पंपटवार (फि.सा.१) यांनी त्यांच्या मौखिक पुराव्यात सांगितले आहे की, ते नोव्हेबर २०२३ पासुन बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या पी/दक्षिण प्रभागात वैदयकीय अधिकारी म्हणुन नियुक्त असून, त्या प्रभागातील अनाधिकृत उदयोगांचा शोध घेणे व अशा उदयोगांवर

आवश्यक कारवाई करणे, त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांकडून ही कामे करुन घेणे, अनाधिकृत उदयोगांबाबतच्या तक्रारींचे निवारण करणे हे त्यांच्या कर्तव्याचे स्वरुप असून याबाबत त्यांना महापालिकेच्या उपायुक्तांनी प्राधिकृत केले आहे. याबाबत त्यांनी तो प्राधिकारपत्र **(नि.क्र.१२)** शाबित केले आहे.

**१२.** श्री. पंपटवार (फि.सा.१) हे पुढे कथन करतात की, दि. ११/०६/२०२५ रोजी ते कर्तव्यावर असताना, त्यांनी मे.एग स्टेशन, शॉप नं १, सबकुच फुड प्लाझा जवळ, न्यु लिंक रोड,चिंचोळी बंदर रोड, मालाड प. मुंबई या ठिकाणी तपासणी केली असता, त्यांना त्या ठिकाणी खानावळीचा व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास आले. त्यावरून त्यांनी त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या इसमास त्या उद्योगासाठी लागणाऱ्या वैध अनुज्ञप्तीबाबत विचारणा केली असता, तो अशी अनुज्ञप्ती दाखवू शकला नाही. त्यांनी त्याचे नांव विचारले असता, त्या इसमाने त्याचे नांव **श्री राजा बाबु** असे असल्याचे व तो त्या उद्योगाचा कार्यवाहक असल्याचे सांगितले. त्यानंतर, श्री. पंपटवार (फि.सा.१) यांनी त्या जागेचा व उद्योगाचा मालक कोण आहे असे विचारले असता, त्या इसमाने ते **श्री किशोर रामलिंग गायकवाड** हे मालक असल्याचे सांगितले. त्यानंतर, श्री. पंपटवार (फि.सा.१) यांनी त्या जागेच्या तपासणीचा तपासणी अहवाल तीन प्रतींमध्ये तयार केला. त्या तपासणी अहवालाची अस्सल प्रत तेथे असलेल्या उद्योगाच्या त्या कार्यवाहक इसमाकडे सुपूर्द करून आपल्याकडे त्याच्या कार्बन प्रती ठेवून घेतल्या. श्री. पंपटवार यांनी सदर तपासणी अहवाल (**नि.क्र.१३**) वर शाबित केला आहे.

**१३.** श्री. पंपटवार (फि.सा.१) हे पुढे कथन करतात की, त्यानंतर सात दिवसांच्या प्रतीक्षेनंतर देखील त्या उद्योगाचा कार्यवाहक अथवा मालक यांपैकी कोणीही श्री. पंपटवार यांच्याकडे येऊन त्या उद्योगाची वैध अनुज्ञप्ती दाखवू शकले नाहीत. त्यामुळे श्री. पंपटवार यांनी या उद्योगावर कारवाई होण्यासाठी गुन्हापत्रक तयार करून तो पुढील कार्यवाहीसाठी महापालिकेच्या विधी विभागाकडे संदर्भित केले. सदर गुन्हापत्रक (**नि.क्र.१४**) शाबीत झाला आहे. श्री. पांपटवर (फि.सा.१) हे पुढे कथन करतात की, ते आरोपीस समक्ष पाहून ओळखू शकतात. तथापि, आरोपीने तो त्याची ओळख आव्हानित करणार नाही व त्याच्या अनुपस्थितीत प्रकरणाची संपरीक्षा चालविण्यास त्यास हरकत नाही असे लिखित निवेदन दिल्यावरून आरोपीची अनुपस्थिती क्षमायापित करून आरोपीच्या अनुपस्थितीमध्ये प्रस्तुत प्रकरणाची संपरीक्षा चालवण्यात आली

असल्याने आरोपीच्या ओळखीबाबतचा प्रश्न याप्रकरणी निरर्थक आहे.

**१४.** श्री. पंपटवार (फि.सा.१) यांची बचावपक्षाकडून उलटतपासणी घेण्यात आली. उलटतपासात या साक्षीदारास त्याने नमुद दिवशी, नमुद ठिकाणी भेट दिली नसल्याचे, प्रस्तुत साक्षीदाराने खोटी कागदपत्रे बनवून त्या आधारे खोटा तपासणी अहवाल व खोटे गुन्हापत्र तयार केल्याचे व हा साक्षीदार न्यायालयासमोर शपथेवर खोटी साक्ष देत असल्याचे सुचकात्मक प्रश्न विचारण्यात आले. या सर्व प्रश्नांना साक्षीदाराने नकारार्थी उत्तर दिले. ज्या सुचकात्मक प्रश्नांचे उत्तर साक्षीदार नकारार्थी देतो अशा प्रश्नांना पुराव्याच्या दृष्टीने शून्यपेक्षा अधिक मूल्य नाही. सबब, साक्षीदाराच्या उलटतपासात बचावपक्षास सहाय्यभूत असे काहीच निष्पन्न झाले नाही. एखादया तथ्याची शाबीती ही साक्षीदारांच्या संख्येवरुन नव्हे तर, अशा साक्षीदाराच्या साक्षीच्या गुणवत्तेवरुन ठरत असते. निश्चितच, अपराधिक प्रकरणांमध्ये आरोपांच्या शाबितीचे दायित्व अभियोग पक्षावर असते. प्रस्तुत प्रकरण हे या प्रस्थापित सिध्दांतास मुळीच अपवाद नाही. अन्य प्रस्थापित विधीसिध्दांत असाही आहे की, सुसंगत, सातत्यपुर्ण व विश्वासार्ह पुरावा असल्यास केवळ एका साक्षीदाराच्या मौखिक पुराव्याच्या आधारे सुध्दा दोषसिध्दी होवू शकते. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी पक्षाने अभिलेखावर सादर केलेला मौखिक तसेच कागदोपत्री पुरावा हा अत्यंत स्पष्ट, सुसंगत, सातत्यपुर्ण व विश्वासार्ह असल्याने आणि, त्या पुराव्यावर शंकेचे कोणतेही सावट नसल्याने तो नाकारण्याचा अथवा, त्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याचे कोणतेही कारण नाही. अशाप्रकारे, अभिलेखावरील मौखिक व कागदोपत्री पुराव्यांच्या आधारे आरोपीवरील दोषारोप वाजवी शंकेच्या पलिकडे शाबित झाले आहे. परिणामी, **<u>विचारार्थ बाब क्र.१</u>** च्या उत्तरादाखल हे न्यायालय **<u>होकारार्थी</u>** निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>विचारार्थ बाब क्र. २ करिताः</u>–**

**१५.** प्रस्तुत प्रकरणात उक्त विवेचनाच्या पार्श्वपटलावर फिर्यादी पक्षाने आरोपीवरील दोषारोप वाजवी शंकेच्या पलिकडे शाबित केल्याचे निष्कर्ष नोंदविल्यानंतर आरोपीवरील दोषारोपीत अपराध सिध्द होतो. परिणामी, आरोपीस **मुंबई महापालिका अधिनियम, १८८८** चे **कलम ३९४(१)(इ)(एक)** मध्ये नमुद तरतुदीचे उल्लंघन करुन याच अधिनियमातील **कलम ४७१** मधील **नोंद क्र. १२०** मध्ये नमुद शिक्षापात्र गुन्ह्यासाठी सिध्दापराधी घोषित करणे आवश्यक बनते. सबब,

उक्त गुन्ह्यासाठी आरोपीस सिध्दापराधी घोषित करुन हे न्यायालय आरोपीस त्या गुन्ह्यासाठीच्या शिक्षेबाबत आरोपीस व फिर्यादी पक्षास निवेदन करण्याची संधी देण्याप्रित्यर्थ याठिकाणी अल्पविराम घेत आहे.

AMRIT CHANDRAKANT BIRAJDAR

Digitally signed by AMRIT CHANDRAKANT BIRAJDAR
Date: 2026.07.20 17:17:42 +0530

स्थळ – विलेपार्ले, मुंबई.
दि. २०/०७/२०२६

( **अमृत चं. बिराजदार** )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (३९वे न्यायालय),
विलेपार्ले, मुंबई.

**१६.** आरोपीस सिध्दापराधी घोषित केल्यानंतर त्यास होणाऱ्या शिक्षेबाबत विचारणा केली असता त्याच्या अधिवक्त्यांनी निवेदन केले की, आरोपीचा हा पहिलाच अपराध असून यापुर्वी त्याने कोणताही गुन्हा केलेला नाही. त्याच्यावर त्याचे संपूर्ण कुटुंब अवलंबित असुन त्याची आर्थिक परिस्थिती हालाखीची आहे. त्यामुळे द्रव्यदंडाची शिक्षा देत असताना न्यायालयाने सौम्यता दाखववी. आरोपीच्या विद्वान अधिवक्त्यांनी युक्तीवाद केला की, आरोपीस आर्थिक सोस होणार नाही असे पाहून आरोपीस न्यायालयाने न्यूनतम द्रव्यदंडाची शिक्षा करावी. याउलट, फिर्यादी पक्षातर्फे सहा. विधी अधिकारी यांनी युक्तीवाद केला की, मुळातच दोषसिध्द गुन्हयासाठी कायद्यात कारावासाची कोणतीही शिक्षा नमूद नसून केवळ द्रव्यदंडाची शिक्षा विहित आहे, अशा परिस्थितीत, आरोपीस महत्तम द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात यावी.

**१७.** उभय बाजूचे निवेदन व युक्तीवाद ऐकल्यानंतर हे स्पष्ट होत आहे की, आरोपीचा हा पहिलाच अपराध आहे. आरोपीविरुध्द सिध्द झालेला अपराध हा तांत्रिक स्वरुपाचा असून तो नैतिक अध:पतनाचा व असामाजिक अपराध नाही. याशिवाय, आरोपीची आर्थिक कुवत विचारात घेऊन आरोपीस त्याच्याविरुध्द दोषसिध्द गुन्ह्यासाठी शिक्षा देताना सौम्य धोरण स्विकारणे न्यायोचित राहील. सबब, **<u>विचारार्थ बाब क्र.२</u>** च्या उत्तरादाखल हे न्यायालय निम्न आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

आरोपी **श्री. किशोर रामलिंग गायकवाड** यांस **मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८** चे **कलम ३९४(१)(इ)(एक)** मध्ये नमुद तरतुदीच्या उल्लंघनार्थ याच **अधिनियमातील**

**कलम ४७१** मधील **नोंद क्र. १२०** मधील मध्ये नमुद शिक्षापात्र गुन्ह्यासाठी **भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(२)** अन्वये सिध्दापराधी घोषित करण्यात येत आहे.

आरोपी **श्री. किशोर रामलिंग गायकवाड** यांस **मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८** चे **कलम ३९४(१)(इ)(एक)** मध्ये नमुद तरतुदीच्या उल्लंघनार्थ याच **अधिनियमातील कलम ४७१** मधील **नोंद क्र. १२०** मधील मध्ये नमुद दोषसिध्द शिक्षापात्र गुन्ह्यासाठी ₹**५०००/–** **(अक्षरी–पाच हजार रुपये)** द्रव्यदंडाची शिक्षा ठोठाविण्यात येत आहे.

आरोपीने उक्त द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास, त्यास पाच दिवसांच्या साध्या कैदेची शिक्षा भोगावी लागेल.

आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहेत.

आरोपीने द्रव्यदंडाची रक्कम भरल्यानंतर त्यास तात्काळ सोडून देण्यात यावे.

आरोपीची उपस्थिती क्षमायापित करण्यात आले असल्याने व प्रकरणाची निर्गती करण्यासाठी होणारा अवाजवी विलंब टाळण्यासाठी प्रस्तुतचा न्यायनिर्णय भारतीय नागरिक सुरक्षा संहिता,२०२३ चे कलम ३९२(६) नुसार आरोपीच्या अनुपस्थितीत घोषित करण्यात येत आहे.

अशाप्रकारे, **खटला क्र. ४१८०/स.ख./२०२५** निर्गत करण्यात येत आहे.

AMRIT CHANDRAKANT BIRAJDAR

Digitally signed by AMRIT CHANDRAKANT BIRAJDAR
Date: 2026.07.20 17:17:51 +0530

स्थळ –विलेपार्ले, मुंबई.
दि. २०/०७/२०२६

(**अमृत चं. बिराजदार**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (३९वे न्यायालय),
विलेपार्ले, मुंबई.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P. D. F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. S.A.. Joshi, Stenographer Higher Grade |
| Name of Court | Shri. Amrit C. Birajdar,<br>Judicial Magistrate, First Class, (39th Court),<br>Vile Parle, Mumbai. |
| Date of Dictation | 20/07/2026 |
| Order signed by the P. O. on | 20/07/2026 |
| Order uploaded on | 20/07/2026 |